कर भरा. राष्ट्र घडवा.

**महाराष्ट्र शासन**
**वस्तू व सेवाकर विभाग**

विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, ३ रा मजला, एच विंग, माझगांव,
मुंबई ४०० ०१०. दूरध्वनी क्र. ०२२-२३७६०३९०/०८७३/०३९२
ई-मेल आय डी- acest००५@gmail.com

---

संदर्भ:- १. शासन निर्णय दिनांक ०५/०३/२००२.
२.शासन निर्णय क्रमांक-विकआ १२१२/प्रक्र.१६२/वि.प्र.४, दिनांक ८/८/२०१२.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ अधिसूचना, दिनांक ११/६/२०१३.
४. शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१.
५. शासन निर्णय दिनांक ०५/०७/२०२१.

## * आदेश *

क्रमांक:- सराआ/आस्था-५/कस-१/४उमेदवार/२०२४-२५/कर सहायक/पदोन्नती/ब- 226 मुंबई दिनांक:- 11/04/2024

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील आदेश निर्गमित करण्यात येईपर्यंत 'परिशिष्ट-अ' मधील नमुद कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, कर सहायक (गट-क) (वेतनस्तर S८-२५५००-८११००) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

सदर पदोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे -

१. शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अदयाप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार गट-क संवर्गातील पदोन्नती कोटयातील रिक्त पदे गट-ड संवर्गातील पात्र उमेदवारांच्या सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त नमूद अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून पदोन्नतीने भरण्यात येत आहेत.

२. कर सहायकांचे वेतनस्तर S-८ (२५५००-८११००) या वेतन श्रेणीत राहील. या वेतनस्तरा व्यतिरीक्त शासन वेळोवेळी ठरवील त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

३. सदर कर्मचाऱ्यांनी सांविधिक विद्यापिठाची पदवी किंवा शासनाने तिच्याशी समकक्ष म्हणून जाहीर केलेली अर्हता धारण केल्याचे मुळ प्रमाणपत्र नियुक्तीचे वेळी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

४. कर सहायक पदावर पदोन्नती झाल्यामुळे रुजू होण्यासाठी हजर राहते वेळी संबंधीत उमेदवाराला परिशिष्ट-ब मधील हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा, कर्मचाऱ्यास कर सहायक पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही. तसे सदर हमीपत्र समाधानकारक नसल्यामुळे स्विकारार्ह नसेल तर उमेदवारास हमीपत्र पुन्हा सादर करावे लागेल.

५. कर सहायक या पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यास कर सहायकांसाठी विहित केलेली विभागीय परीक्षा, त्या संबंधी केलेल्या नियमातील तरतूदीनुसार उत्तीर्ण होण्यातून त्याला/तिला सुट मिळाली नसल्यास सदर कर्मचाऱ्यास कर सहायक वर्गीय सेवा प्रवेशोत्तर विभागीय परीक्षा,विहित मुदतीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यांची सेवा ज्येष्ठता गमावण्यात येईल व त्यांची वेतन वाढ रोखण्यात येईल तसेच त्यांचा पुढील पदोन्नतीकरीता विचार करण्यात येणार नाही.

६. कर सहायक पदावर पदोन्नत झालेल्या व्यक्तीस जर तो/ती अगोदरच उत्तीर्ण झाला नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर त्याला/तिला हिंदी व मराठी भाषा परीक्षा संबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास कर सहायक या पदावरील सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

७. कर सहायक पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्याने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई, अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळी उमेदवारांकडे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून २ वर्षांच्या आत संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. या कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८. कर सहायक या पदावर पदोन्नत केलेला कर्मचारी हा महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होणेस पात्र राहील.

९. या कर सहायकांची ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता) नियम, १९८२ व या बाबतीत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार निश्चित करण्यात येईल.

१०. जर कर्मचारी शासन सेवेतील कर सहायक या पदावरील पदोन्नतीसाठी/नेमणूकीसाठी सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे पात्र नव्हता अथवा विहित अर्हता प्राप्त करत नव्हता अथवा त्यांनी नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, असे नंतर आढळून आले, तर अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३ अकरा, दि. १२/१०/१९९३ मधील तरतूदीनुसार समाप्त करण्यात येतील व त्या अनुषंगिक निर्देशानुसार कारवाई करण्यात येईल.

११. सदर पदोन्नती शासनाच्या वेळोवेळी पारित होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१२. परिशिष्ट -अ च्या स्तंभ -२ मधील कर्मचाऱ्यांची पदोन्नती पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत करण्यात आली असुन त्यांची सेवा समाप्ती कोणतीही पुर्व सुचना न देता करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच त्यांना सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे असल्यास त्या बाबतची लेखी सुचना एक महिना आगाऊ या कार्यालयास देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्या कडुन एक महिन्याच्या मुळ वेतनाएवढी रक्कम वसुल केली जाईल.

१३. **परिशिष्ट-अ च्या स्तंभ-२ मधील कर्मचाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून मा.विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय,तिसरा मजला,वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई येथे हजर होणे आवश्यक आहे. सदर कार्यालयामार्फत त्यांचे मूळ कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच परिशिष्ट-अ मधील स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात कर सहायक या पदावर रुजु करुन घेतले जाईल.**

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)**

**(महेश कुलकर्णी)**
**राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

सहपत्रे -परिशिष्ट - अ व ब

प्रत सादर:- मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत रवाना:-**

१. आहरण व संवितरण अधिकारी, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर.
४. संबंधीत क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त.
५. संबंधीत राज्यकर सहआयुक्त.
६. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
७. संबंधीत जिल्हा आहरण व कोषागार अधिकारी.
८. संबधित उमेदवार (संबंधीत राज्यकर सहआयुक्तांमार्फत)
९. स्थळप्रत.

## परिशिष्ट -अ

क्रमांक:- सराआ/आस्था-५/कस-१/४उमेदवार/२०२४-२५/कर सहायक/पदोन्नती/ब- 226 मुंबई दिनांक:- 11/08/2025

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | सध्याचे नेमणूकीचे कार्यालय | पदोन्नतीनंतरचे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्रीम. निर्मला सतिश तांबे | कर सहायक | महाराष्ट्र विक्रीकरण, न्यायाधिकरण, मुंबई | अपर राज्यकर आयुक्त कार्यालय, झोन-१, माझगांव, मुंबई. |
| २. | श्री. राकेश आनंद वानखेडे | कर सहायक | जनसंपर्क व सुरक्षा, माझगांव, मुंबई | अपर राज्यकर आयुक्त कार्यालय, झोन-२, माझगांव, मुंबई. |
| ३ | श्री. सौरभ भरत डोंगरे | कर सहायक | राज्यकर सहआयुक्त, नोडल-१, वस्तू व सेवाकर कार्यालय, कल्याण | अपर राज्यकर आयुक्त कार्यालय, ठाणे. |
| ४. | श्रीम. प्रार्थना संजय निर्गुण | कर सहायक | राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगांव, मुंबई | अपर राज्यकर आयुक्त कार्यालय, झोन-५, माझगांव, मुंबई. |

(महेश कुलकर्णी)
राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

## परिशिष्ट -ब

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------- घोषित करतो /करते की, कर सहायक या पदावर पदोन्नतीसाठी वस्तू व सेवाकर विभागास सादर केलेली कागदपत्रे चुकीची असल्यास व भविष्यात चुकीची माहिती आढळून आल्यास माझी कर सहायक पदावरील नेमणुक कोणत्याही टप्प्यावर रद्द केल्यास माझी काहीही हरकत असणार नाही. तसेच वस्तू व सेवाकर विभागाकडुन करण्यात येणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:- उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

## कर्मचाऱ्याचा रुजु अहवाल
## पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्याने त्यास पदोन्नती दिलेल्या कार्यालयात रुजु झाल्याबाबतचा अहवाल

कर्मचाऱ्याचे नांव:-
भ्रमणध्वनी क्रमांक:-

प्रति,
मा. सहाय्यक राज्यकर आयुक्त
आस्थापना-५, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३ रा मजला, एच विंग, वस्तू व सेवाकर भवन
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

महोदय,

मी खाली सही करणार श्री./श्रीम./कु. ------------------------------------------------ नमुद करतो/करते की, आपले आदेश क्र. ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------- दि. ........................रोजीचे पत्र मला मिळाले. त्यानुसार मी ------------------------------------------------ या विभाग/कार्यालयात कर सहायक या पदावर दिनांक --------------- रोजी रुजु झालो/झाले आहे. हे आपणांस माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

आपला/आपली,

उमेदवाराचे नांव व सही

उमेदवारास नियुक्ती दिलेल्या कार्यालयाचे अभिवेदन*(खालील तळटीप पहावी)

कळविण्यात येते की,श्री./श्रीम./कुमा.-------------------------------------- हे उमेदवार दि. -------------- रोजी कर सहायक या पदावर रुजु झालेले आहेत. संबंधीत उमेदवारांच्या ओळखपत्राची पडताळणी करण्यात आलेली असुन त्यांना कर सहायक या पदावर हजर करुन घेण्यात आलेले आहे.

आस्थापना अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्का

<u>तळटीप:-</u> कर्मचाऱ्याने पदोन्नती दिलेल्या विभाग/कार्यालयात रुजु झाल्यानंतर वरील पत्र तात्काळ या विभागास सादर करावे अन्यथा त्यांना दिलेली पदोन्नती त्यांनी स्वीकारली नाही असे समजुन योग्य ती पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.